**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मऱ्याप्पा कृष्णा नरळे
मु.गोंधळेवाडी, पो.आसंगी जत, ता.जत, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
मिरज उपविभाग, ता.मिरज, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४२८ / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, सांगली श्री.डी.एस.पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
मिरज उपविभाग, ता.मिरज, जि.सांगली श्री.संजीव पलांडे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१६.११.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.४.१२.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२०.१.२०१० |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.४.२.२०१० |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

तत्कालीन मंडल अधिकाऱ्यांनी फेरफार नोंदीबाबत चुकीचा निर्णय घेतल्यामुळे आपले नुकसान झाले. नोंदी रद्द करण्याच्या चुकीच्या कार्यवाहीचा खुलासा आपल्याला मिळाला नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.मन्याप्पा कृष्णा नरळे यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

श्री.नरळे यांच्या दि.१६.११.२००९ रोजीच्या अर्जाला दि.४.१२.२००९ रोजी उत्तर दिले. जमीन नोंदीविषयक निर्णयाच्या अनुषंगाने आक्षेपाचे मुद्दे श्री.मरळे यांनी माडले असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत त्यांचा निर्णय होऊ शकत नाही. त्यासाठी महसूल नियमावलीनुसार त्यांनी सक्षम प्राधिकाऱ्याकडे अपील करता येईल, असे कळविले. अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, सांगली यांनी तसाच निर्णय दिला., असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, मिरज उपविभाग, मिरज, जि.सांगली श्री.संजीव पलांडे यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, मिरज उपविभाग, मिरज, जि.सांगली व अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, सांगली यांनी केलेली कार्यवाही रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
16 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रमेश गणपतराव वरूडकर
द्वारा-श्री.राजेश सोन पराते
प्लॉट नं.८०/१८, दादू चौगुलेनगर, कळंबा, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक जय शिवराज हायस्कूल,
कसबा ठाणे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४३० / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रमेश गणपतराव वरूडकर
द्वारा-श्री.राजेश सोनपराते
प्लॉट नं.८०/१८, दादू चौगुलेनगर, कळंबा, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, कोल्हापूर प्रतिनिधी श्री.एस.ए.गिरी

| | |
|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक जय शिवराज हायस्कूल, कसबा ठाणे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर श्री.टी.एस.पाटील | |

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३१.८.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१.२.२०१० |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२०.१०.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१६.१२.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण मागितलेली माहिती मुख्याध्यापकांच्या कक्षेतील नसून संस्थेकडील आहे, असे सांगून नाकारली जाते. क्रीडांगणासाठी बनावट संचालक मंडळ दाखवून शासनाकडून अनुदान येतले. हे अनुदान शाळेला मिळाले असून त्याची माहिती शाळेकडून दिली गेली पाहिजे, अशी मागणी अपीलकर्ता श्री.रमेश गणपतराव वरूडकर यांनी केली.

संस्थेच्या अखत्यारीतील माहितीची मागणी अपीलकर्ता सातत्याने मुख्याध्यापकांकडे जाणीवपूर्वक करीत आहेत. माहिती देण्याबाबत संस्थेला आपण लेखी कळविले, परंतु मुंबई उच्च न्यायालयाकडील नागपूर खंडपीठाने श्री.भास्करराव शंकरराव कुलकर्णी विरूध्द राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ (रीट पिटीशन क्र.५२९४ / २००८, दि.२८.४.२००९) या प्रकरणी या प्रकरणी दिलेल्या निर्णयानुसार संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, असे संस्थेचे म्हणणे आहे व संस्थेने माहिती दिली नाही. संस्थांतर्गत वाद असून अपीलकर्ता वारंवार माहिती-मागणी करणारे अर्ज, अपिले व तक्रारी करून त्रास देत आहेत. क्रीडा अनुदान शाळेकडे नाही, संस्थेकडे वर्ग केलेले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जय शिवराज हायस्कूल, कसबा ठाणे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर श्री.टी.एस.पाटील यांनी केले.

याच स्वरूपाची अपीलकर्त्यांची काही अपिले आयोगाने यापूर्वी निकाली काढली असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचे प्रतिनिधी

श्री.एस.ए.गिरी यांनी नमूद केले. संस्थेकडून घेऊन माहिती द्यावी असे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जय शिवराज हायस्कूल, कसबा ठाणे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर यांना दिले होते, असेही त्यांनी सांगितले.

संस्थेच्या अखत्यारीतील माहिती शाळेचे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक देऊ शकत नाहीत, हे अपीलकर्ता यांच्या यापूर्वीच्या काही अपिलांमध्येही स्पष्ट झालेले आहे. अशा स्थितीत पुनःपुन्हा तशाच अर्जांची व प्रतिपादनाची पुनरावृत्ती अपीलकर्त्यांनी करणे हा सर्व यंत्रणांचा वेळ व परिश्रम याचा अपव्यय आहे, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
16 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. राजू बजरंग राजगुरु
रा.पेनुर, ता.मोहोळ, अपीलकर्ता
जि.सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
तहसील कार्यालय मोहोळ,
जि.सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
तहसील कार्यालय मोहोळ,
जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४३२/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३/०६/२०१० |
| ३ | **उपस्थिती**<br>**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**<br>तहसील कार्यालय मोहोळ, जि.सोलापूर<br>श्री.पी.एन.दिक्षीत<br>**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**<br>तहसील कार्यालय मोहोळ, जि.सोलापूर<br>यांचे प्रतिनिधी श्री.व्ही.पी.मोरे (पुरवठा अव्वल कारकुन) | |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६/१२/२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३१/०३/२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६/०२/२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३१/०३/२००९ |
| ८ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** मौजे पेनुर येथील गट नं.९७१/२ व ९७४ वरील श्री.आर.पी.राजगुरु यांच्या अपहारप्रकरणातील रक्कमेच्या लिलाव प्रक्रियेबाबतची माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. राजू बजरंग राजगुरु यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.२३/०६/२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मी मागणी केल्याप्रमाणे सर्व माहिती मला मिळाली आहे. त्याबद्दल माझी काही तक्रार राहिली नाही. तरी माझे आयोगाकडील अपील निकाली काढण्याची विनंती आहे', असा अपीलकर्ता श्री.राजगुरु यांचा दि.२२/०६/२०१० रोजीचा जबाब अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय मोहोळ, जि.सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री.व्ही.पी.मोरे, पुरवठा अव्वल कारकून यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**पुणे.**
**दि :-** 15 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सतीश नरसू मोरे
सिध्दार्थनगर, मु.पो.पेठ वडगाव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, वडगाव नगरपरिषद,
वडगाव, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा भांडारपाल, बांधकाम विभाग,
वडगाव नगरपरिषद, वडगाव, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४६५ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सतीश नरसू मोरे
सिध्दार्थनगर, मु.पो.पेठ वडगाव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, वडगाव नगरपरिषद,
वडगाव, जि.कोल्हापूर श्री.राजेंद्र फातले

**जन माहिती अधिकारी** तथा भांडारपाल, बांधकाम विभाग,
वडगाव नगरपरिषद, वडगाव, जि.कोल्हापूर
श्री.आर.एम.पाटील, श्री.आर.बी.ढवळे, श्री.उदयकुमार डोंगरे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.८.९.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.७.१०.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२३.१०.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१.१.२०१० |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

नगरपालिकेचया हद्दीतील सर्व सरकारी जागेचे सीटीएस क्रमांक, अपूर्ण राहिलेले खाजगी रस्ते आदीची माहिती जन माहिती अधिकारी तथा भांडारपाल, बांधकाम विभाग, वडगाव नगरपरिषद, वडगाव, जि.कोल्हापूर यांनी विहित मुदतीत व पूर्ण दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.सतीश नरसू मोरे यांनी केली.

अपीलकर्ता यांनी सरसकट स्वरूपाची विस्तृत माहिती मागितली होती. विशिष्ट कालावधी दिला नव्हता. तीन विभागाकडून प्राप्त करून माहिती द्यावयाची होती. विहित मुदतीत उत्तर दिले. प्रथम अपिलाच्या वेळी माहिती अपूर्ण असल्याची तक्रार करून आणखी काही तपशील त्यांनी मागितला, तोही दिला. आपण नव्यानेच कार्यभार स्वीकारला होता. उपलब्ध सर्व माहिती दिली. श्री.मोरे यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ मधील दुरूस्तीबाबतचा हवा असलेला तपशील त्यांना पूर्वी दिला होता. अपणखी तपशील दोन दिवसात देता येईल. सर्व संचिकाचे अवलोकन त्यांनी करावे. त्यातील कोणतीही माहिती त्यांना देता येईल, असे अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, वडगाव नगरपरिषद, वडगाव, जि.कोल्हापूर यांनीही स्पष्ट केले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा भांडारपाल श्री.आर.बी.ढवळे, अभियंता श्री.आर.एम.पाटील, सॅनिटरी इन्स्पेक्टर श्री.उदयकुमार डोंगरे (सर्व वडगाव नगरपरिषद, वडगाव, जि.कोल्हापूर) यांनी केले.

मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ मधील दुरूस्तीच्या संदर्भातील अपीलकर्त्यास हवा असलेला सर्व तपशील दोन दिवसांत द्यावा, आणखी काही माहिती व कागदपत्रांच्या प्रती हव्या असल्यास अपीलकर्त्याने संबंधित संचिकांचे अवलोकन करून योग्य ते शुल्क भरून माहिती प्राप्त करून

घ्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार मुद्दा क्र.४ मधील माहिती दि.२१.५.२०१० रोजी व दि.२४.५.२०१० रोजी शिपायामार्फत समक्ष पाठविली असता श्री.मोरे यांनी घेण्यास नकार दिला. त्यामुळे यूपीसीद्वारे माहिती पाठविण्यात अली, असा अहवाल जन माहिती अधिकारी तथा भांडारपाल, भांडारपाल, बांधकाम विभाग वडगाव नगरपरिषद, वडगाव, जि.कोल्हापूर श्री.आर.बी.ढवळे यांनी दि.२४.५.२०१० च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला. श्री.मोरे यांनी दि.२६.५.२०१० रोजी माहिती मिळाली नसल्याची तक्रार केली. तथापि देऊ केलेली माहिती का स्वीकारली नाही, याबाबत त्यांनी काहीही नमूद केलेले नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे

16 JUN 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. चंद्रकांत बाबुराव पुजारी
मु.पो.कुंभारी, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर .. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, दक्षिण सोलापूर
जि. सोलापूर .. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४८३ / सोलापूर / २०१० |
| २ | सुनावणीची तारीख | २७.४.२०१० |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. चंद्रकांत बाबुराव पुजारी
मु.पो.कुंभारी, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, दक्षिण सोलापूर
जि. सोलापूर श्री. जी. एस. सांगडे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर श्री. ए. जे. भोसले

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२.९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ८.१०.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.१.२०१० |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

रास्त भाव धान्य दुकानदाराकडून आपल्याला अन्नधान्य व रॉकेल मिळत नसल्याबद्दल वारंवार तक्रार करूनही कार्यवाही झाली नाही, म्हणून त्या संदर्भात आपण माहिती मागितली. साठ दिवस वाट पाहून अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर यांच्याकडे अपील केले, परंतु कोणतीही माहिती मिळाली नाही. संबंधित दुकानदार कोणालाही धान्य विक्रीच्या पावत्या देत नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. चंद्रकांत बाबुराव पुजारी यांनी केली.

श्री. पुजारी यांनी मागणी केलेली माहिती पुरवठा विभागाकडील असल्यामुळे त्यांच्याकडून मागविली. संबंधित दुकानदाराकडून मार्च २००४ पासूनची ही माहिती संकलित करून द्यावी लागणार असल्यामुळे विलंब लागेल, असे श्री. पुजारी यांना कळविले होते. १७५० पानांची ही माहिती दुकानदारांकडून प्राप्त करून घेऊन अपीलकर्त्यास शुल्क कळविले, परंतु त्यांनी शुल्क भरले नाही व माहिती नाकारली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर श्री. ए. जे. भोसले यांनी केले. संबंधित माहितीच्या प्रती त्यांनी सादर केल्या.

माहिती तयार असल्याचे कळवूनही व ती विनाशुल्क देण्याचे आदेश अपिलाच्या निर्णयात देऊनही श्री. पुजारी यांनी माहिती नेली नाही. संबंधित दुकानदाराकडून धान्य व रॉकेल न मिळाल्याची तक्रार करणारे श्री. पुजारी हे कुंभार्ली, ता. दक्षिण सोलापूर या गावी राहत नाहीत. संबंधित दुकानदार व अपीलकर्ता यांना एकत्र बोलावून माहितीबाबत सूचना दिल्या होत्या. पाच वर्षातील माहिती संकलित करून दुकानदाराकडून प्राप्त करून घेतल्यानंतर अपीलकर्ता ती नेत नाही. जाणीवपूर्वक त्रास देण्याच्या उद्देशाने माहिती घेण्यास ते टाळाटाळ करीत आहेत, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर श्री. जी. एस. सांगडे यांनी केले.

अपीलकर्त्यास केलेल्या पत्रव्यवहाराबाबत जावक बारनिशीची प्रत जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, दक्षिण सोलापूर यांनी सादर करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार पूर्तता केल्याचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, दक्षिण सोलापूर यांनी दि. २७.४.२०१० च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला. संबंधित

दुकानदार आपल्याला रॉकेल देत नाही, अवैध दराने इतरांना जादा दराने ते विकले जाते. त्याबाबत वारंवार तक्रारी करूनही दक्षिण सोलापूर तहसील कार्यालय, जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांच्याकडून तक्रारीबाबत कारवाई केली जात नाही, इ. तक्रारी हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही. तसेच खुलासा, स्पष्टीकरण या कायद्यान्वये मागता येणार नाही. देऊ केलेली माहिती न घेण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही, याबाबत त्यांना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 16 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रामलिंग भगवान चव्हाण
तहसील कार्यालय, वाई, ता.वाई, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार, जि.नंदुरबार — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा लेखाधिकारी, लेखा शाखा,
जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार, जि.नंदुरबार

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४९१ /२०१० / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.५.२०१० |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा लेखाधिकारी, लेखा शाखा,
जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार, जि.नंदुरबार श्री.एस.डी.गोसावी

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३०.९.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.८.१०.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.४.११.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१५.१२.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपल्या बरोबरच्या अन्य परीविक्षाधीन नायब तहसीलदारांना पदोन्नती देऊन वरिष्ठ वेतनश्रेणीतील फरकाची रक्कमही दिली. आपल्याल मात्र सात वर्षांनंतरही असा लाभ दिलेला नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.रामलिंग भगवान चव्हाण, नायब तहसीलदार, वाई, जि.सातारा यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात व लेखी निवेदनात केली आहे.

अपीलकर्त्यांनी नमूद केलेल्या परीविक्षाधीन नायब तहसीलदारांना वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ देता येत नसल्याबाबत शासनाच्या सर्व आदेशांच्या प्रतींसह सर्व माहिती देण्यात आली आहे. तसेच संबंधित वेतनधारिकेच्या छायांकित प्रतीही पुरविल्या आहेत, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा लेखाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार, जि.नंदुरबार श्री.एस.डी.गोसावी यांनी पूरक कागदपत्रांसह केले. अपीलकर्त्यांस माहिती देण्यात आली आहे. त्यांच्या अपिलातील पदोन्नतीबाबतचे आक्षेप माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचे नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
16 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. नंदकुमार रामचंद्र पिसे
रा. १०५५-क, दत्त टेलर्स,
गावभाग पोलिस चौकीसमोर, सांगली .. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,
भूमि अभिलेख, कोल्हापूर, जि. कोल्हापूर .. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शिरस्तेदार,
अधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, कोल्हापूर
जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५४५ / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | २५.५.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** - श्री. नंदकुमार रामचंद्र पिसे<br>रा. १०५५-क, दत्त टेलर्स,<br>गावभाग पोलिस चौकीसमोर, सांगली<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,<br>भूमि अभिलेख, कोल्हापूर, जि. कोल्हापूर श्री. शाम दत्तात्रय खामकर<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा शिरस्तेदार,<br>अधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, कोल्हापूर<br>जि. कोल्हापूर श्री. सुधीर देवगोंडा अलगौडर | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.८.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६.८.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ६.१.२०१० |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपल्या मिळकतीबाबतच्या एस.आय. फाईलमधील क्र.१ ते ९९ या पृष्ठांच्या प्रती मिळण्यासाठी आपण जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, अधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, कोल्हापूर यांच्याकडे अर्ज केला होता. संबंधित संचिका अवर सचीव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांच्याकडे दि. १०.८.२००९ रोजीच्या पत्रान्वये पाठविली असल्यामुळे माहिती देत नसल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविले. अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, कोल्हापूर यांनी त्यांचा निर्णय योग्य ठरविला. जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार यांनी आपला अर्ज संबंधित विभागाकडे वर्ग करावयास हवा होता, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. नंदकुमार रामचंद्र पिसे यांनी केले.

श्री. पिसे यांचा दि. १७.८.२००९ च्या अर्जाला दि. २६.८.२००९ रोजी उत्तर पाठविले. शासनाकडे संबंधित संचिका पाठविल्याच्या पत्राची पोंहच नंतर त्याना पुरविली. विशिष्ट संख्या श्री. पिसे यांनी नोंदविली असली तरी चार पैकी दोन संचिका त्याहून अधिक पृष्ठांच्या आहेत. त्यामुळे त्यांना नेमक्या कोणत्या पृष्ठांच्या प्रती हव्या आहेत, हे त्यांनाच पहावे लागेल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, अधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, कोल्हापूर श्री. सुधीर देवगोंडा अलगौडर व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, कोल्हापूर श्री. शाम दत्तात्रय खामकर यांनी केले.

जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत उत्तर दिले आहे. अवर सचिव, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या कार्यालयाने श्री. पिसे यांना संबंधित संचिकेचे अवलोकन करू द्यावे व त्यातील त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्राच्या प्रती योग्य ते शुल्क आकारून द्याव्यात, असे आयोगाचे

आदेश संबंधितांना जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी कळवावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. आयोगाने सुनावणीच्या वेळी दिलेल्या आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, अधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, कोल्हापूर यांनी दि. २.७.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

३. अवर सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांनी वरील आदेशानुसार पूर्तता करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि. १०.७.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.** 24 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**प्रत :** अवर सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२ यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. मनोज सखाराम पाटील
प्लॉट नं.११, यशवंत नगरी,
कसबा मुक्ती व्हिलेज सोसायटी मागे,
जयंती अपार्टमेंट समोर, बारामती
जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक,**
सहकारी संस्था यांचे कार्यालय,
मार्केट यार्ड, इंदापूर रोड,
ता.बारामती, जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
दि माळेगांव बुद्रुक माध्यमिक शिक्षण सेवक सहकारी पतसंस्था लि.,
माळेगाव बुद्रुक, ता.बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५५५/२०१०/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री.शरद शंकरराव कर्णे यांना दीर्घ मुदतीचे कर्ज मंजूर करण्याच्या प्रक्रियेसंदर्भातील माहिती | |

**विवेचन**

नागरी सहकारी बँका व नागरी सहकारी पतसंस्था यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५६६६/२००७ प्रकरणी दिलेला आहे. सबब सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 22 JUN 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.सत्वशील धैर्यशील शेळके
इंद्रप्रस्थ बिल्डिंग, शिरवळ रोड,
मु.पो.लोणंद, ता.खंडाळा,
जि.सातारा

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
खंडाळा, जि.सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
खंडाळा, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५५६/सातारा |
| २ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. सत्वशील धैर्यशील शेळके यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. तरीही सदर अपिलाचा समावेश दि.५/०२/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत

कार्यक्रमांत करण्यात आला होता. तथापि सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. शेळके व जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, खंडाळा, व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, खंडाळा, जि.सातारा यांपैकी कोणीही उपस्थित नव्हते. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 17 JUN 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.महिंद्र नंदकुमार शेटे
श्रीकृपा श्रीरामनगर, मु.पो.बुधगाव, ता.मिरज, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,
कवठे महांकाळ, ता.कवठे महांकाळ, जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,
कवठे महांकाळ, ता.कवठे महांकाळ, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५६३ / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,
कवठे महांकाळ, ता.कवठे महांकाळ, जि.सांगली श्री.रविंद्र बोंबले

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,
कवठे महांकाळ, ता.कवठे महांकाळ, जि.सांगली श्री.जे.आर.तराळ

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२०.८.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.६.९.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२४.१२.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

विहित मुदतीत शुल्क भरूनही माहिती मिळाली नाही व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, कवठे महांकाळ, तहसील कार्यालय, कवठे महांकाळ, ता.कवठे महांकाळ, जि.सांगली यांनी अपिलाची दखल घेतली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.महिंद्र नंदकुमार शेटे यांनी आयोगाकडील अपील अर्जात केली.

श्री.शेटे यांच्या दि.१८.८.२००९ च्या अर्जाला दि.२६.८.२००९ रोजी उत्तर दिले व शुल्क कळविले. माहिती व्यक्तिशः स्वीकारणार असल्याचे त्यांनी नमूद केले असल्यामुळे माहिती तयार असल्याचे दि.३.९.२००९ च्या पत्रान्वये कळविले. माहिती न नेल्याबाबत पुन्हा दि.८.३.२०१० च्या पत्रान्वये त्यांना स्मरण दिले व रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, कवठे महांकाळ, तहसील कार्यालय, कवठे महांकाळ, ता.कवठे महांकाळ, जि.सांगली श्री.जे.आर.तराळ यांनी केले. श्री.शेटे यांनी अपील दाखल केले त्या काळात साखर कारखान्याची निवडणूक, अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे इ. तातडीची कामे होती. त्यामुळे विहित मुदतीत सुनावणी घेता आली नाही. माहिती घेण्यासाठी श्री.शेटे आले त्यावेळी बैठक चालू असल्यामुळे त्यांची भेट होऊ शकली नाही. त्यांचा संपर्क न झाल्यामुळे माहिती रजिस्टर्ड टपालाने पाठविली, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, कवठे महांकाळ, तहसील कार्यालय, कवठे महांकाळ, ता.कवठे महांकाळ, जि.सांगली श्री.रविंद्र बोंबले

यांनी नमूद केले. ते लक्षात घेता जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, कवठे महांकाळ, तहसील कार्यालय, कवठे महांकाळ, ता.कवठे महांकाळ, जि.सांगली यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
16 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

<table>
<tr><td colspan="2">श्री. सुरेश शामराव हराळे<br>मु. पो.भोसे, ता.मिरज, जि. सांगली</td><td>अपीलकर्ता</td></tr>
<tr><td colspan="3">विरूध्द</td></tr>
<tr><td>अपिलीय प्राधिकारी तथा</td><td>जिल्हा आरोग्य अधिकारी<br>जिल्हा परिषद, सांगली</td><td rowspan="2">उत्तरवादी</td></tr>
<tr><td>जन माहिती अधिकारी तथा</td><td>वैद्यकीय अधिकारी<br>प्राथमिक आरोग्य केंद्र, भोसे,<br>ता. मिरज, जि. सांगली</td></tr>
</table>

<table>
<tr><td>१</td><td>अपील क्रमांक</td><td>५६४ / २०१० / सांगली</td></tr>
<tr><td>२</td><td>सुनावणीची तारीख</td><td>१९.५.२०१०</td></tr>
<tr><td>३</td><td colspan="2">उपस्थित</td></tr>
<tr><td></td><td>अपीलकर्ता</td><td>श्री. सुरेश शामराव हराळे<br>मु. पो.भोसे, ता.मिरज, जि. सांगली</td></tr>
<tr><td></td><td>अपिलीय प्राधिकारी तथा</td><td>जिल्हा आरोग्य अधिकारी<br>जिल्हा परिषद, सांगली डॉ. अशोक प्रल्हाद वाघमारे</td></tr>
<tr><td></td><td>जन माहिती अधिकारी तथा</td><td>वैद्यकीय अधिकारी<br>प्राथमिक आरोग्य केंद्र, भोसे,<br>ता. मिरज, जि. सांगली डॉ. ए. एस. मुरकुटे</td></tr>
<tr><td>४</td><td colspan="2">माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे.</td></tr>
</table>

## विवेचन

आपण पाठविलेल्या पत्रानुसार माहिती मिळाली नाही, म्हणून माहितीच्या अधिकारात अर्ज केला. जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केद्र, भोसे, ता. मिरज यांनी माहिती तयार असल्याचे कळविले. परंतु शुल्क कोठे भरावे हे कळविले नाही.

एकाच निवासस्थानात दोन कर्मचारी राहत असल्याचे कळविले.अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांनी अपिलाची सुनावणी न घेता साधे पत्र दिले अशी तक्रार अपीलकर्ता श्री. सुरेश शामराव हराळे यांनी केली.

अपीलकर्त्याच्या दि. ५.९.२००९ च्या अर्जाला दि. २९.९.२००९ रोजी उत्तर दिले. त्यात शुल्क पुरविण्याबाबतचा तपशील कळविला होता. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ ची अंमलबजावणीबाबतची त्यांनी मागितलेली माहिती तयार करुन देण्यास विलंब लागेल, असे कळविले होते. त्यासह सर्व माहिती दिली आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, भोसे, ता. मिरज डॉ. ए. एस. मुरकुटे यांनी पूरक कागदपत्रांसह केले. ते रास्त असल्याचे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली डॉ.अशोक प्रल्हाद वाघमारे यांनी केले.

जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, भोसे, ता. मिरज व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 22 JUN 2010

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.समाधान रामचंद्र वारे
मु.पो.कालगाव, ता.कराड, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सदस्य, जात पडताळणी समिती, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा संशोधन अधिकारी, विभागीय जाती
प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५७८ / २०१० / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.समाधान रामचंद्र वारे
मु.पो.कालगाव, ता.कराड, जि.सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र
पडताळणी समिती क्र.१, पुणे श्री.दिवक रावसाहेब वडकुते

| | |
|---|---|
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आपल्या मागणीनुसार जात पडताळणी प्रमाणपत्र व त्याबाबतची माहिती दिलेली नाही. त्यामुळे पदोन्नतीचा लाभ आपल्याला मिळालेला नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.समाधान रामचंद्र वारे यांनी केली.

अपीलकर्त्याच्या मूळ अर्जात जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी दाखल केलेल्या कागदपत्रांवरील कार्यवाहीची माहिती विचारली होती. परंतु प्रस्ताव केव्हा व कोणत्या कार्यालयामार्फत सादर करण्यात आला आदी तपशील दिला नव्हता. त्यामुळे त्याबाबत विचारणा करणारे उत्तर अपीलकर्त्यास विहित मुदतीत दिले. तसेच जात पडताळणीची हजारो प्रकरणे जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे असल्यामुळे अपीलकर्ता यांनी समक्ष येऊन स्वतःच्या संचिकेबाबतचा तपशील दिल्यास माहिती देता येईल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१, पुणे श्री.दिपक रावसाहेब वडकुते यांनी केले. अपीलकर्त्यास आवश्यक तर त्यानुसार कार्यवाही करता येईल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
16 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मोहन शिवराम वाघमारे
मु.पो.रामानंदनगर, ता.पलूस, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रमुख लिपिक,
अधीक्षक, भूमी अभिलेख, सांगली यांचे कार्यालय, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५९७ /२०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२५.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मोहन शिवराम वाघमारे
मु.पो.रामानंदनगर, ता.पलूस, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सांगली श्री.महेश शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा प्रमुख लिपिक,
अधीक्षक, भूमी अभिलेख, सांगली यांचे कार्यालय, सांगली श्री.अशोक कदम

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२४.९.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१.१०.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२७.१०.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.११.११.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण विकत घेतलेल्या मिळकतीच्या संदर्भात खुलासा व नगररचना मंजूर नकाशा आदी माहिती जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक, अधीक्षक, भूमी अभिलेख, सांगली कार्यालय, जि.सांगली व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सांगली कार्यालय, जि.सांगली यांच्या पातळीवरून योग्य स्वरूपात मिळाली नाही व त्या अनुषंगाने आवश्यक असलेली कार्यवाही केलेली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.मोहन शिवराम वाघमारे यांनी केली.

श्री.वाघमारे यांनी मागणी केलेली आपल्या विभागाकडील माहिती सात दिवसांत पुरविली. मात्र त्यांनी मागितलेली मुद्दा क्र.३,४,५ ची माहिती या कार्यालयाच्या कक्षेतील नसून, नगररचना विभाग, महसूल खाते, तालुका निरीक्षक भूमी अभिलेख अशा विविध कार्यालयांकडील असून तेथून ती घेण्यास श्री.वाघमारे यांना कळविले. संबंधित मिळकतीचा पोटहिस्साही झालेला आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक, अधीक्षक, भूमी अभिलेख, सांगली कार्यालय, जि.सांगली श्री.अशोक कदम यांनी केले. सर्व कार्यालयांकडील माहिती प्राप्त करून घेऊन जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक, अधीक्षक, भूमी अभिलेख, सांगली कार्यालय, जि.सांगली यांनीच दिली पाहिजे, ही अपीलकर्त्यांची मागणी रास्त नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

पुणे
16 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अनिल राजाराम बाबर
म्हैसल वेस,भिमनगर मिरज,ता.मिरज,
जि.सांगली **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तालुका कृषी अधिकारी,
तालुका कृषी अधिकारी, मिरज यांचे कार्यालय,जि.सांगली **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** कृषी अधिकारी,
मिरज तहसीलदार कार्यालय आवार,
ता.मिरज,जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५९९/२०१०/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.०५.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** तालुका कृषी अधिकारी,<br>तालुका कृषी अधिकारी, मिरज यांचे कार्यालय,<br>जि.सांगली श्री.आर.जी.गंगावणे<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** कृषी अधिकारी,<br>मिरज तहसीलदार कार्यालय आवार,<br>ता.मिरज,जि.सांगली श्री.बी.आर.पल्लखे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण मागणी केलेली माहिती परिपूर्णरीत्या मिळाली असून काहीही तक्रार नाही, असे लेखी निवेदन अपीलकर्ता श्री.अनिल राजाराम बाबर यांनी दि.०६.०४.२०१० च्या पत्रान्वये दिले असल्याचे निवेदन जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, मिरज तहसीलदार कार्यालय आवार, ता.मिरज,जि.सांगली श्री.बी.आर.पल्लखे यांनी संबंधित पत्राच्या प्रतीसह केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 29 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

| | | |
|---|---|---|
| श्री. भूपाल बाळू चौगुले<br>मु.पो. अंकली, ता. मिरज, जि. सांगली | | अपीलकर्ता |
| **विरूध्द** | | |
| **अपिलीय प्राधिकारी तथा** | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मिरज जत, जि. सांगली | उत्तरवादी |
| **जन माहिती अधिकारी तथा** | ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, अंकली ता. मिरज, जि.सांगली | |

| | | |
|---|---|---|
| १ | **अपील क्रमांक** | ६०१ / २०१० / सांगली |
| २ | **सुनावणीची तारीख** | १९.५.२०१० |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. भूपाल बाळू चौगुले<br>मु.पो. अंकली, ता. मिरज, जि. सांगली |
| | **अपिलीय प्राधिकारी तथा** | गट विकास अधिकारी वर्ग-१, पंचायत समिती, मिरज जत, जि. सांगली तर्फे प्रतिनिधी श्री. डी. आर. गुरव |
| | **जन माहिती अधिकारी तथा** | ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, अंकली ता. मिरज, जि.सांगली श्री. राहुल बा. देसाई |
| ४ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

अतिक्रमण करून बांधलेल्या घराबाबत पंचायत समितीने कोणत्या आधारे परवानगी दिली, याचे उत्तर जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, अंकली ता. मिरज यांनी दिले नाही. संबंधित बांधकाम थांबविण्याबाबत आपण दिलेल्या अर्जावर उडवाउडवीची उत्तरे देऊन योग्य कारवाई केली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी वर्ग-१, पंचायत समिती,

मिरज यांनीही मागणीची दखल घेतली नाही. बांधकाम परवान्याबाबतचा निर्णय बेकायदेशीर आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. भूपाल बाळू चौगुले यांनी केली.

अपीलकर्त्याच्या दि. २०.१२.२००९ च्या अर्जावर दि. १९.१.२०१० रोजी माहिती दिली. अपिलीय प्राधिकारी यांच्या निर्णयानंतर चार दिवसांत आणखी माहिती दिली, असे जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, अंकली, ता. मिरज श्री. राहुल बा. देसाई यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. अपीलकर्त्याची मागणी माहितीची नसून प्रशासकीय कार्यवाहीची आहे. त्याबाबत योग्य ते उत्तर त्यांना देण्यात आले आहे, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी गट विकास अधिकारी वर्ग-१, पंचायत समिती, मिरज यांचे प्रतिनिधी श्री. डी. आर. गुरव यांनी केले.

जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, अंकली ता. मिरज व अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी वर्ग-१, पंचायत समिती, मिरज यांनी केलेली कार्यवाही योग्य असून अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे

दि. 22 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ